स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 05–02–2016** रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 7. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 8. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 9. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 10. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 11. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 12. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 2. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 3. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 4. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 597** :– प्र. क्र. 11 अ आणि ब बेझनबाग बुध्दनगर व नवानकाशा येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त ३ निविदा पैकी मे. ग्लोबल इंजिनिअरींग वर्क यांची सुधारीत प्राकलनीय दराची (सुधारीत दराची) रू. २९,९९,९९५/– (एकोणतीस लक्ष नव्यांन्नव हजार नऊशे पंच्यान्नव रूपये फक्त) रकमेची निविदा, स्विकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 598** :– प्रभाग क्र. 44 (अ) दर्शन कॉलनी येथील प्रस्तावित उद्यानात विविध विकास कामाकरिता रु. 34,11,840/– रकमेच्या कामास स्थायी समिती ठराव क्र. 399/दि. 04.01.2016 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्या अनुषंगाने विविध कामाच्या निविदा मागविल्या असता प्राप्त निविदाचे वाटाघाटी द्वारे दर कमी करण्यात आल्यानुसार निम्नतम निविदा खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदाकाराचे नाव | टक्के कमी/ जास्त दर | निविदा राशी |
|---|---|---|---|---|
| 1. | विविध स्थापत्य कामे | मे. दिपक एस. आदमने | 1.19% कमी | रु. 1877234/– |
| 2. | हिरवळीची कामे | मे. कन्स्ट्रक्शन | 2.5% कमी | रु. 1143499/– |
| 3. | खेळणी बसविणे | मे. एक्सेल फायब्रोटेक प्रा.लि. | 1.6% कमी | रु. 333773/– |
| | | | एकूण रु. | रु. 33,54,506/– |

प्राप्त वरील प्रमाणे एकत्रित राशी रु. 33,54,506/– च्या निम्नतम निविदांना मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 599** :– प्रभाग क्र. ४६–ब, चिटणविस नगर येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. सेठ कंस्ट्रक्शन कंपनी, यांची प्राकलनीय दरापेक्षा १.६५ टक्के अधिक दराची रू. ४९,८५,३८५/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 600** :– प्रभाग क्र. ६१, दिघोरी दहन घाट येथे विविध विकासाचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. संतोष आर. खरपकर, यांची प्राकलनीय दरापेक्षा १.१० टक्के कमी दराची रू. २८,७९,२३०/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 601** :– प्रभाग क्र. 3 अ आणि ब येथील यशोधरा नगर, गरीब नवाज नगर व सरोवराबाद येथे सिमेंट रोडचे बांधकाम करण्याचे कामास्तव प्राप्त 9 निविदापैकी मे. ब्रजेश के. मिश्रा यांची प्राकलनीय दरापेक्षा 1.15 टक्के कमी दराची रू. 29,65,494/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 602** :– प्रभाग क्र. 70 (अ, ब) अंतर्गत पडोळे लेआऊट गोपालनगर, सरस्वती विहार कॉलोनी व इतर विविध ठिकाणी रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त मे. M/s Seth Construction Company यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा राशी रूपये 29,99,656/– च्या दरापेक्षा 3.50 प्रतिशतने अधिक दराची रूपये 31,04,644/– रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 603</u> :— प्रभाग क्र. ६३, सुभेदार ले—आऊट, आशीर्वाद नगर, बिडीपेठ येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. सेठ कन्स्ट्रक्शन कंपनी यांची प्राकलनीय दरापेक्षा २.०० टक्के अधिक दराची रु. ३०,५९,३९६/— रकमेची निम्नतम निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

कामाचा खर्च प्रती प्रभाग ३०.०० लक्ष पर्यंत सिमीत ठेवण्यात येईल.

<u>ठराव क्रमांक 604</u> :— प्रभाग क्र. ३६ अ/ब नेहरुनगर प्रजापती नगर, वर्धमान नगर, येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. डी.सी. गुरुबक्षाणी यांची २.०० टक्के अधिक दराची रु. ३०,५९,६१९/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर कामाकरिता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A२२००१३३०८०३ मधून आर्थिक वर्ष २०१५—१६ मध्ये रु. १५.०० लक्ष प्रती नगरसेवक राशी तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे.

<u>ठराव क्रमांक 605</u> :— नागपूर महानगरपालिकेचे महात्मा फुले मार्केट, भवन व थोक सब्जी मार्केट येथील पार्कींग स्टॅन्ड श्री. प्रकाश धर्माजी अंचलवार, नागपूर यांना दि. 5/02/2008 च्या मंजुरी नुसार प्रतिदिवस रू. 21,000/— या प्रमाणे देण्यात आला होता. त्यांनी 31 जुलै 2013 पर्यंतचा स्टॅन्डची पुर्ण राशी म.न.पा. कडे जमा केली.

कृषी उत्पन्न बाजार समितीचा होलसेल भाजी मार्केट कळमना यार्ड ए.पी.एम. सी. येथे दि. 24/08/2013 रोजी स्थानांतरीत झाला त्यामुळे या ठिकाणी येणारे भाजीचे सर्व प्रकारचे वाहन येणे बंद झाले. त्यामुळे कंत्राटदार श्री. अंचलवार यांनी दि. 27/08/2013 रोजी पत्र दिले व रू. 21,000/— प्रति दिवस प्रमाणे देणार नाही. तसेच पार्कींग स्टॅन्डची भुमीका राहणार नाही.

तत्पुर्वी मा. ना. श्री. भास्कर जाधव, राज्य मंत्री, नगर विकास, वने, बंदरे, खार जमीन, संसदीय कार्य, क्रिडा व युवक कल्यान व माजी सैनिकांचे कल्यान, विधी व न्याय आणि मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र शासन मुंबई. यांनी दि. 20/10/2010 रोजी मा. आयुक्त, म.न.पा. यांचे कडे निवेदन सादर करून ''सदरचा प्रस्ताव'' तपासुन सादर करावा तोपर्यंत पुढील कार्यवाही स्थगीत करावी. अशा प्रकारचे निवेदन विभागास दि. 25/10/2010 रोजी प्राप्त झालेले होते. श्री. प्रकाश अंचलवार यांची अपिल क्र. 4090/2010 च्या अनुषंगाने स्थगनादेश रद्द करण्याबाबत आणि महात्मा फुले, सायकल/स्कुटर स्टॅन्ड ची निविदा पुर्ण होण्याबाबत मा. राज्यमंत्री, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. यांना पत्र क्र. 121/एम.एस. दि. 23/07/2011 व्दारे कळविण्यात आले होते. यानंतर पत्र क्र. 15/एम.एस. दि. 20/04/2013 अन्वये खाजगी सचिव (मा. राज्यमंत्री) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. यांना सदरची स्थगीती तत्काळ उठविण्याकरीता पत्र पाठविण्यात आले होते. यानंतर पुन्हा प्रकरणाची वस्तुस्थिती स्पष्ट करून विभागीय पत्र क्र. 700/एम.एस. दि. 17/03/2015 रोजी

स्थगीती उठविण्याबाबत मा. प्रधान सचिव (2), महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई – 32 यांना पत्र पाठविण्यात आले होते. सदर प्रकरणात श्री. शशिकांत योगे, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई – 32 यांनी सदरची स्थगीती उठविण्याबाबतचे पत्र विभागास दि. 27/03/2015 रोजी प्राप्त झालेले होते. (पत्राची प्रत नस्ती सोबत टांचण आहे.) सदर प्रकरणात स्थगीती उठविण्याबाबतचे पत्र प्राप्त झाल्यानंतर विभागातर्फे ऑगष्ट, 2013 ते मार्च, 2015 पर्यंत रू. 21,000/– प्रति दिवस प्रमाणे म.न.पा.स घेणे असलेले एकुण रक्कम रू. 1,09,41,000/– प्रस्ताव तयार करून सादर करण्यात आले होते.

म.न.पा. बाजार विभागाने येथील पार्कींग स्टॅन्ड वर येणाऱ्या वाहनांचा सर्वे करून म.न.पा.ला उत्पन्न होण्याच्या दृष्टीने मौका चौकशी नुसार, रू. 7250/– प्रति दिवस प्रमाणे रू. 22,62,000/– वार्षीक उत्पन्न लक्षात घेवुन रू. 25,00,000/– ची ई–निविदा काढण्याचा प्रस्ताव दि. 5/02/2014 ला दिला.

तसेच नोव्हेंबर 2014 मध्ये फेर मौका चौकशी करून येणाऱ्या वाहनांचा अहवाला वरून सदरहु पार्कींग स्टॅन्ड करीता पर्यायी व्यवस्था होईपर्यंत श्री. प्रकाश अंचलवार तात्पुरता कंत्राटदार यांना रू. 6,500/– प्रति दिवस (शुक्रवार दिवस वगळता) या अटिवर चालविण्याची अनुमती देण्याबाबत निर्णय स्थायी समिती, म.न.पा. व्दारा उचित राहील असे प्रस्तावित जुन 2015 मध्ये करण्यात आलेले होते. त्या प्रस्तावास सदरहु बाब वित्तीय असल्यामुळे, एकवेळेस CAFO यांचे अभिप्राय घेवुन फेरसादर करण्याचे मा. आयुक्त, म.न.पा. यांनी आदेशीत केले होते.

त्याप्रमाणे मा. प्रमुख लेखा व वित्त अधिकारी, म.न.पा. यांचे अभिप्राय दि. 20/08/2015 रोजी प्राप्त झालेले होते.

1) ऑगष्ट 2013 ते मार्च 2015 पर्यंत ठेक्याचे रू. 1,09,41,000/– ऐवजी रू. 31,26,000/– मुळे रू. 78,15,000/– ची सरळ सकृतदर्शनी म.न.पा.ची हानी दिसते. तथापी टिपणीत नमुद बाबी बाजाराचे कळमना येथे स्थानांतरण त्यामुळे कंत्राटदाराने रू. 21,000/– ऐवजी रू. 6,000/– भरण्यास तयारी दर्शविणे ह्या सर्व बाबी वित्तीय औचित्यास अनुसरून निर्णयीत करणे अपेक्षीत आहे.

2) नविन मुदत वाढीसाठी विभागाकडुन सुस्पष्ट प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. ई–निविदा प्रक्रिया पुर्ण लवकरात लवकर पुर्ण करून पर्यायी व्यवस्था म्हणुन सध्याच्या कंत्राटास मुदतवाढ देता येईल.

उक्त अभिप्राया प्रमाणे विभागाने खालील प्रमाणे प्रस्तावित केले होते.

1) श्री. प्रकाश अंचलवार यांचे कडे मार्च 2015 पर्यंत एकुण म.न.पा.ला घेणे असलेली थकीत रक्कम रू. 1,09,41,000/– बाबत नस्ती डा. बा. पृष्ठ क्र. 73 वर उल्लेख करण्यात आलेला होता.

2) ऑगष्ट 2013 ते मार्च 2015 पर्यंत ठेक्याचे रू. 1,09,41,000/– ऐवजी रू. 31,26,000/– मुळे रू. 78,15,000/– ची सरळ हानी होईल या मुद्यावर धोरणात्मक निर्णय होणे अपेक्षीत होते.

3) प्रकरणात ई–निविदा प्रक्रिया पुर्ण हाईस्तोवर पर्यायी व्यवस्था म्हणुन संबंधीत ठेकेदारास नविन मुदत वाढी करीता विभागास स्वतंत्र प्रस्ताव सादर करता येईल. असे प्रस्तावित करून तत्पुर्वी प्रकरणात सुधारीत विषयाचे प्रारूप तयार करण्यात आले होते.

सदर प्रकरणात उक्त प्रमाणे विभागातर्फे अभिप्राय सादर करण्यात आल्यानंतर मा. उपायुक्त (II) म.न.पा. यांनी नस्ती पुन्हा मा. प्रमुख लेखा व वित्त अधिकारी, म.न. पा. यांच्याकडे पाठविण्यात आली होती. त्यावर मा. प्रमुख लेखा व वित्त अधिकारी, म.

न.पा. यांनी विभागाने दि. 20/08/2015 च्या अनुषंगाने निर्णय घ्यावा समान बाबी करीता नस्ती पुन्हा वित्त विभागाकडे सादर करण्याचे कोणतेही औचित्य नाही असे नमुद करून नस्ती परत विभागाकडे दि. 7/09/2015 रोजी पाठवण्यात आली. यावर मा. प्रमुख लेखा व वित्त अधिकारी, म.न.पा. यांनी वित्तीय बाबी वरील अभिप्राय स्पष्टपणे सादर केले नसल्याने, विभागातर्फे पुन्हा दि. 24/09/2015 रोजी प्रस्तावित करण्यात आली होती. त्यावर मा. उपायुक्त (II) म.न.पा. यांनी दि. 30/10/2015 रोजी सदर बाब हि वित्तीय बाब असल्याने मा. आयुक्त, म.न.पा. यांचे दि. 30/06/2015 चे आदेशानुसार प्रस्ताव मान्य करणे उचित आहे अथवा अनुचित आहे याबाबत प्र.ले.वि.अ. यांचे स्पष्ट वित्तीय अभिप्राय घेवुन सादर करावे. असे निर्देशीत करून नस्ती पुन्हा प्र.ले.वि.अ. यांच्याकडे पाठविण्यात आली होती.

त्यावर त्यांनी खालील प्रमाणे मुद्दे मांडलेले होते.

1) वित्त विभागाने दिलेले दि. 20/08/2015 चे अभिप्राय स्पष्ट आहेत.

2) वित्त विभागाने सुचविलेल्या कार्यवाहीचे कुठलेही पालन झाले नाही.

3) नव्याने निविदा प्रक्रिया करण्याची अजुनही सुरूवातच झालेली नाही.

4) विभागाने सादर केलेले प्रस्ताव स्विकारणे अनुचितच तथापी विभागाच्या दिरंगाईमुळे विभागाचे नुकसान होवु नये म्हणुन विभागाचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवुन समितीच्या निर्णया नुसार विभागाने कार्यवाही करणे अपेक्षीत आहे.

5) ह्या प्रकरणातील विभागाची अस्पष्टता हि संबंधीतास फायदेशीर ठरून म.न.पा. स हानीकारक ठरत असल्याचे स्पष्ट होते.

या मुद्यांसह नस्ती मा. उपायुक्त (II) म.न.पा. यांचे कडे गेली असता, मुद्दा क्र. 4 मध्ये सदर प्रस्ताव स्विकारणे अनुचित असल्याचे स्पष्ट केले आहे. असे असतांना स्थायी समितीपुढे स्पष्ट प्रस्ताव ठेवण्यात यावा.

त्यावर विभागातर्फे मुद्देनिहाय प्रस्ताव सादर करण्यात आला असता, सहा. आयुक्त (बाजार) यांनी दि. 10/12/2015 रोजी खालील प्रमाणे अभिप्राय सादर केले.

ज्ञापन पृष्ठ क्र. 89 वर वित्त विभागानी उपस्थित केलेला मुद्दा क्र. 2 बाबत सादर करण्यात येत आहे कि वित्त विभागाने सुचविलेल्या कार्यवाहीचे पालन झालेले आहे.

मुद्दा क्र. 2 अन्वये उपस्थित बाबींशी बाजार विभाग, सहमत नाही. कारण निविदा प्रक्रिया करणे करीता वेळोवेळी प्रस्तावित करण्यात आले. बाजार विभागाव्दारा कोणतीही दिरंगाई करण्यात आलेली नाही. निविदा प्रक्रिया करणे करीता Competetent Authority ची मंजुरी गरजेची आहे.

बाजार विभागानी वेळोवेळी संबंधीत प्रकरणाच्या Facts सादर केलेल्या आहेत. बाजार विभागाने कधीही म.न.पा.चे नुकसान होईल असा प्रस्ताव सादर केलेला नाही.

कृपया ज्ञापन पृष्ठ क्र. 84 वरील 'अ' प्रमाणे प्रस्तावित बाबींचे पुनश्चः अवलोकन व्हावे. महात्मा फुले पार्कींग स्टॅन्ड ठेक्याची रू. 21,000/— प्रतिदिन ह्या प्रमाणे ऑगष्ट 2013 ते मार्च 2015 पर्यंत ठेक्याचे रू. 1,09,41,000/— कंत्राटदार कडुन घेणे असल्याचे व रू. 21,000/— प्रतिदिन ऐवजी रू. 6,000/— प्रतिदिन प्रमाणे घेणे बाबत स्थायी समिती, म.न.पा. च उचित निर्णय घेवु शकेल असेच बाजार विभागाने प्रस्तावित केले होते.

यावर मा. उपायुक्त (II) म.न.पा. यांनी 1) लिलाव प्रक्रिया तात्काळ पुर्ण होणे आवश्यक आहे. जेणे करून पुढे उचित दर प्राप्त होवुन नविन कंत्राटदारास काम देता येईल.

2) चालु कंत्राटच्या दरम्यान दर कमी करून त्याच कंत्राटदारास कमी दराने काम दिल्यास लेखा आक्षेप येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3) मा. स्थायी समिती सभापती यांचे पत्रा नुसार तसा प्रस्ताव स्थायी समितीपुढे पाठविणे उचित राहील.

यावर मा. आयुक्त, म.न.पा. यांनी दि. 30/12/2015 रोजी आदेशीत केल्याप्रमाणे CAFO यांचे अभिमत व नस्तीमधील सत्यता तपासल्यानंतर असे निदर्शनास आले.

1) फुले मार्केट कळमना येथे ऑगष्ट 2013 रोजी स्थानांतरीत झाल्यानंतर अर्जदार श्री. प्रकाश अंचलवार यांचे सायकल/स्कुटर स्टॅन्डचे उत्पन्न कमी झाल्यामुळे कंत्राटदार करारनामा प्रमाणे रू. 21,000/– प्रति दिवस प्रमाणे ठेक्याची राशी म.न.पा. स देण्यास असमर्थ असल्यामुळे, त्यांनी रू. 6,000/– प्रति दिवस प्रमाणे भाडा आकारण्याचे विनंती केली.

सदर प्रकरणात वस्तुस्थिती अशीही आहे कि, हा निर्णय सन 2013 मध्येच घ्यावयास पाहीजे होता. प्रकरणात विलंब झाल्याचे निदर्शनास येते. परंतु आता वेळ न घालविता विभागाने सुधारीत विषयाचे प्रारूप रू. 6,000/– प्रति दिवस प्रमाणे (शुक्रवार दिवस वगळता) चालु तारखे पासुन निर्णय होण्याकरीता सायकल/स्कुटर स्टॅन्डचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे सादर करावा.

2) स्थायी समितीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या निर्णया नुसार नविन लिलाव प्रध्दतीचा अवलंबन करावा.

याप्रमाणे मा. आयुक्त, म.न.पा. यांनी दि. 30/12/2015 रोजी आदेशीत केले असल्यामुळे त्यानुसार प्रश्न विचारात घेणे.

श्री. प्रकाश अंचलवार यांनी दि. 25/10/2013 रोजी पत्र दिले व हा स्टॅन्ड प्रति दिवस रू. 6,000/– प्रमाणे चालविण्याची मंजुरी मागीतली व त्यानुसार त्यांनी म.न.पा. कडे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) | धनादेश क्र. 081290 | दि. 10/04/2015 | रू. 16,00,000/– | पावती क्र. 408/020351 |
| 2) | धनादेश क्र. 081295 | दि. 11/05/2015 | रू. 1,08,000/– | पावती क्र. 408/020352 |
| 3) | धनादेश क्र. 081291 | दि. 25/05/2015 | रू. 4,00,000/– | पावती क्र. 408/020355 |
| 4) | धनादेश क्र. 081300 | दि. 12/06/2015 | रू. 1,44,000/– | पावती क्र. 408/020358 |
| 5) | धनादेश क्र. 468958 | दि. 06/08/2015 | रू. 1,44,000/– | पावती क्र. 408/020360 |
| 6) | धनादेश क्र. 468954 | दि. 03/07/2015 | रू. 1,44,000/– | पावती क्र. 408/020362 |
| 7) | धनादेश क्र. 468963 | दि. 11/09/2015 | रू. 1,56,000/– | पावती क्र. 408/020374 |
| 8) | धनादेश क्र. 468967 | दि. 14/10/2015 | रू. 1,50,000/– | पावती क्र. 408/020381 |
| | | एकुण रूपये | 28,46,000/– | |

असे एकुण रू. 28,46,000/– म.न.पा. खात्यामध्ये जमा केलेले आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे महात्मा फुले कॉटन मार्केट येथील होलसेल भाजी मार्केट कळमना यार्ड ए.पी.एम.सी. येथे दि. 24/08/2013 रोजी स्थानांतरीत झाल्यामुळे, येथील म.न.पा.च्या पार्कींग स्टॅन्ड वर वाहने येत नसल्याने उत्पन्न कमी झाल्याचे निदर्शनास येते.

1) या पार्कींग स्टॅन्ड करीता श्री. प्रकाश अंचलवार कंत्राटदार यांना दि. 5/02/2008 ला दिलेली मंजुरी कृषी उत्पन्न बाजार समितीचा होलसेल भाजी मार्केट कळमना यार्ड ए.पी.एम.सी. येथे दि. 24/08/2013 रोजी स्थानांतरीत झाल्यामुळे, मा. आयुक्त, म.न.पा. यांचे दि. 30/12/2015 रोजीच्या आदेशानुसार चालु तारखेपासुन अर्थात दि. 1/01/2016 पासुन रू. 6,000/– प्रति दिवस दराने महात्मा फुले मार्केट, सायकल/स्कुटर स्टॅन्ड करीता सुधारीत प्रस्ताव सादर करणे.

2) सदर प्रकरणात दि. 1/01/2016 पासुन रू. 6,000/– दराने उक्त सायकल/स्कुटर स्टॅन्डच्या ठेक्या करीता सुधारीत प्रस्ताव सादर केल्यास, फुले मार्केट येथील सायकल/स्कुटर स्टॅन्ड करीता कंत्राटदाराकडुन दि. 1 ऑगष्ट 2013 ते दि. 31/12/2015 या कालावधी करीता रू. 21,000/– प्रमाणे हिशोब गोळा बेरीज करून त्यांनी म.न.पा.कडे भरलेली रक्कम वजा करून उर्वरीत रकमेविषयी गृहीत धरणे आवश्यक राहील.

3) श्री. प्रकाश अंचलवार यांच्या कडे महात्मा फुले सायकल/स्कुटर स्टॅन्ड करीता माहे ऑगष्ट 2013 ते ऑक्टोंबर 2014 या कालावधी करीता रू. 21,000/– प्रति दिन प्रमाणे एकुण रू. 82,11,000/– शिल्लक. माहे नोव्हेंबर 2014 ते जानेवारी 2015 या कालावधी करीता एकुण रू. 16,59,000/– शिल्लक तसचे माहे फेब्रुवारी 2015 ते मार्च 2015 या कालावधी करीता एकुण रू. 10,71,000/– शिल्लक, माहे एप्रिल 2015 ते ऑक्टोंबर 2015 या कालावधी करीता एकुण रू. 38,43,000/– शिल्लक आणि 1 नोव्हेंबर 2015 ते 31 डिसेंबर 2015 या कालावधी करीता एकुण शिल्लक रू. 11,13,000/– अशी एकुण रू. 1,58,97,000/– म.न.पा.स घेणे असुन त्यापैकी श्री. प्रकाश अंचलवार यांनी सायकल/स्कुटर स्टॅन्डच्या ठेक्या पोटी ऑगष्ट 2013 नंतर सोबतचे तक्त्यामध्ये दाखविल्याप्रमाणे म.न.पा. कडे रू. 28,46,000/– चा भरणा केलेला असुन श्री. प्रकाश अंचलवार यांचे कडुन उक्त सायकल/स्कुटर स्टॅन्डच्या ठेक्याकरीता रू. 1,30,51,000/– म.न.पा.स घेणे ठरतात.

म्हणुन श्री. प्रकाश अंचलवार यांचा उक्त सायकल/स्कुटर स्टॅन्ड करीता प्रति दिवस रू. 6,000/– प्रमाणे त्यांच्या निवेदना नुसार भरण्याबाबतचा प्रश्न तसेच त्यांच्या कडे रू. 21,000/– प्रति दिवस प्रमाणे ऑगष्ट 2013 ते 31 डिसेंबर, 2015 पर्यंत निघत असलेली उर्वरीत रक्कम रू. 1,30,51,000/– निर्णय घेणे बाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

1. कृषी उत्पन्न बाजार समितीचे होलसे भाजी मार्केट कळमना यार्ड ए.पी.एम.सी. येथे दि. 24.08.2013 रोजी स्थानांतरीत झाल्यामुळे दि. 24.08.2013 पासुन रु. 6500/– प्रमाणे राशी वसुल करण्यात यावी.
2. दि. 24.08.2013 पुर्वी निविदा कंत्राटाच्या अटी शर्ती मधील नमुद राशी प्रमाणे बकाया राशी घ्यावी.
3. या प्रकरणात तातडीने सर्वेक्षण करुन नव्याने लघु निविदा काढण्यात याव्या.

वरील 1, 2 व 3 या सुचनेस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 606 :–** प्रभाग क्र. 50 सरदार पटेल चौक ते जातडरोडी चौक ते मेडिकल चौक पर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रू. 1,20,99,800/–रकमेच्या प्रशासकीय मंजुरी प्रदान करून निविदा काढण्याचा व या आर्थिक वर्षात पद क्र. 370(A42001330801) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 607 :–** महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉन्ट करीता नागपूर शहरातील रस्त्याची दुरुस्ती व सूस्थीती व तसेच डांबरीकरणाच्या कामासाठी मे. हिंदूस्थान पेट्रोलीयम कारपोरेशन लि. (H.P.C.L.)/मे. भारत पेट्रोलीयम कारपोरेशन लि. (B.P.C.L.) या राष्ट्रीयकृत कंपनीकडून अग्रिमद्वारे रु. 3,46,04,928.00 राशीचे डांबर खरेदी करण्याचे प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तदनंतर मे. हिंदूस्थान पेट्रोलीयम कारपोरेशन लि./मे. भारत पेट्रोलीयम कारपोरेशन लि. यांचेकडून टप्याटप्याने खरेदी करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 608 :–** प्रभाग क्र. 71, राजेंद्रनगर येथील प्रस्तावित उद्यानात विविध विकास कामाकरिता रु. 37,07,385/– रकमेच्या कामास स्थायी समिती ठराव क्र. 358/दि. 21.12.2015 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्या अनुषंगाने विविध कामाच्या निविदा मागविल्या असता प्राप्त निम्नतम निविदा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदाकाराचे नाव | टक्के कमी/जास्त दर | निविदा राशी |
|---|---|---|---|---|
| 1 | विविध स्थापत्य कामे | मे. एस.एस.उघडे | 1.9% कमी | रु. 14,48,578/– |
| 2 | हिरवळीची कामे | मे. एस.एस.उघडे | 2.7% कमी | रु. 17,22,843/– |
| 3 | खेळणी बसविणे | मे. रचित सेल्स | 0.99% कमी | रु. 2,57,525/– |
| | | | एकूण रु. | रु. 34,28,946/– |

प्राप्त वरील प्रमाणे एकत्रित राशी रु. 34,28,946/– च्या निम्नतम निविदांना मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 609 :–** प्रभाग क्र. 66 (ब), अंतर्गत द्वारकापूरी येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी में. आर. एम. दयारमानी हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 3.50 % टक्के अधीक दराची निविदा रूपये 51,73,256/- ( रूपये एक्कावन लक्ष त्र्याहत्तर हजार दोनशे छप्पन रूपये फक्त ) स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्रमांक 681 (A22001330802) अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याच्या मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 610</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर